# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
## MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES
म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक - ४२२ ००४
Mhasrul, Dindori Road, Nashik – 422 004.
**Phone:** 0253-2539175 / **EPABX:** 0253-2539100 - 300 / **Fax:** 0253-2539176
**E-mail:** pro@muhsnashik.com / **Web:** www.muhsnashik.com


क्र. मआविवि/पीआर/८६५/२०११     <u>वृत्त प्रसिध्दीसाठी</u>     दि.०३ ऑक्टोबर २०११

<u>आंतरविद्यापीठ इंद्रधनुष्य २०११ सांस्कृतिक युवा महोत्सव</u>

## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात संघ निवड चाचणीचे आयोजन

नाशिक (दि.०३) - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने यावर्षीच्या आंतरविद्यापीठ इंद्रधनुष्य २०११ सांस्कृतिक युवा महोत्सवाचे यजमानपद स्वीकारले असून या युवा महोत्सवासाठी विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करणारा संघ निवडीसाठी निवड चाचणीचे आयोजन केले असल्याची माहिती विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ. अरुण जामकर यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देतांना मा. कुलगुरु प्रा.डॉ.अरुण जामकर यांनी सांगितले की, मा.कुलपती कार्यालयाने यावर्षीच्या इंद्रधनुष्य २०११ युवा महोत्सवाची जबाबदारी आरोग्य विद्यापीठावर सोपविली आहे. हा युवा महोत्सव दि.०५ नोव्हेंबर २०११ ते दि. ०९ नोव्हेंबर २०११ कालावधीत आयोजित करण्यात आला असल्याची माहिती त्यांनी दिली. ते पुढे म्हणाले की, विद्यापीठातर्फे "स्पंदन" युवा महोत्सवाचे दरवर्षी आयोजन करण्यात येत असते. मात्र या स्पंदन महोत्सवामध्ये विद्यापीठाच्या परीक्षेच्या वेळापत्रकामुळे काही वर्षाच्या विद्यार्थ्यांना सहभाग घेता येत नाही. तरी या विद्यार्थ्यांना सहभाग घेता येऊन आपल्या सुप्त कलागुणांना वाव मिळण्यासाठी, त्यांना व्यासपीठ मिळण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली. या स्पर्धेत नाटय कला, साहित्य, संगीत, ललीत कला आणि नृत्य या प्रमुख कला प्रकारांमध्ये विद्यार्थी आपल्या कलाविष्कार सादर करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

याबाबत विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. आ.ना.सूर्यकर यांनी सांगितले की, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठावर सोपविण्यात आलेल्या इंद्रधनुष्य २०११ युवा महोत्सवात विद्यापीठाचा संघ निवडीसाठी विद्यापीठाशी संलग्नित विविध आरोग्य शाखांच्या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी या निवड चाचणीमध्ये भाग घेतला असून यातून परीक्षक विद्यार्थ्यांची निवड करणार आहे. या निवडक स्पर्धकांचा संघ महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व या युवा महोत्सवामध्ये करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. ते पुढे म्हणाले की, या निवड चाचणीसाठी विविध क्षेत्रातील नामवंत परीक्षकांची नियुक्ती विद्यापीठातर्फे करण्यात येऊन अतिशय पारदर्शकपणे संघ निवड करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या निवड चाचणीसाठी परीक्षकांचा विद्यापीठाचे मा.कुलगुरु यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या परीक्षकांमध्ये श्रीमती राधिका गोडबोले, श्री. मोहन उपासनी, प्रा. उध्दव अष्टूरकर, श्रीमती जयश्री अभोणकर, श्री. संजय देवधर आणि श्री. नंदू भावसार आदींचा विद्यापीठातर्फे सत्कार करण्यात आला. तसेच डॉ. रमेश शेकोकार, डॉ. राजीव पाठक, श्री. प्रवीण कांबळे, श्रीमती शुभदा कुलकर्णी, श्रीमती लक्ष्मी पिंपळे, श्री.डी.पी. पवार, डॉ. शेखर कुलकर्णी परीक्षक म्हणून उपस्थित होते. विद्यार्थी कल्याण विभागाचे प्रभारी संचालक श्री. एन.व्ही. कळसकर यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धाबाबत मार्गदर्शन केले. यावेळी आयोजित परीक्षकांचा परिचय जनसंपर्क अधिकारी श्री. स्वप्नील तोरणे यांनी केला. या स्पर्धेचे आयोजन विशेष कार्य अधिकारी प्रा.बी.व्ही. कापडणीस यांनी केले. यावेळी सहभागी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

S.D.
कुलसचिव